**उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांची पात्रता व त्यांना अनुज्ञेय असलेले क्षेत्र ठरविणे बाबतची कार्यपध्दती विहित करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन,
गृहनिर्माण विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२९/ दुवपु-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ८ मार्च, २०१९

**वाचा** :- १. शासन निर्णय क्र.लोकआ २००७/प्र.क्र.१२०(अ)/दुवपु-१, दि. १६.०८.२०१०.
२. शासन निर्णय क्र.लोकआ २००७/प्र.क्र.१२०(अ)/दुवपु-१, दि. २२.०२.२०१३.
३. शासन शुध्दीपत्रक क्र.लोकआ २००७/प्र.क्र.१२०(अ)/दुवपु-१, दि.०६.०५.२०१४
४. शासन निर्णय क्र.लोकआ २००७/प्र.क्र.१२०(अ)/दुवपु-१, दि.२५.५.२०१६.
५.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२९/ दुवपु-१ दि. ७.१०.२०१७

**प्रस्तावना**

मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांची पात्रता व त्यांना अनुज्ञेय असलेले क्षेत्र ठरविणेबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र.लोकआ २००७/प्र. क्र. १२०(अ)/दुवपू-१, दि.१६.८.२०१० अन्वये निश्चित करण्यात आली आहे . तदनंतर शासनाच्या दि. २२.०२.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुर्वीच्या दि . १६.०८.२०१० रोजीच्या शासन निर्णयामध्ये अंशतः बदल करण्यात आला. सदरचे दोन्ही शासन निर्णय हे निर्गमित केल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयामधील तरतुदींनूसार भाडेदारी प्रमाणित करताना भाडेकरु / रहिवाशी यांच्याकडे त्यांच्या खोलीचे दि.१३.६.१९९६ पूर्वीचे भाडेदारी हक्क तथा रहिवास असल्याबाबतचे कागदोपत्री पुरावे असुनही फक्त दि. १६.०८.२०१० व दि. २२.०२.२०१३ चे शासन निणय हे शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येत असल्यामुळे संबंधित भाडेकरु / रहिवाशी यांचा हक्क असुनही त्यांच्या हक्कावरती बाधा येत असल्याचे कळवून दि. १६.०८.२०१० व दि. २२.०२.२०१३ रोजीचे शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याची विनंती उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी शासनास केली होती.

दरम्यानच्या कालावधीत मा. उच्च न्यायालयाने W.P.१६६३/२०११ मध्ये दि. १९/०३/२०१५ रोजी असे आदेश दिले की, ज्या प्रकल्पांना दि. १६.०८.२०१० पुर्वी पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे व अशा प्रकरणांमध्ये विकासकाने अद्याप म्हाडास देय होणारे अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपुर्द केलेले नाही, अशा प्रकरणी दि. १६.०८.२०१० रोजीचे शासन निर्णय पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यावेत. मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश व सदर आदेशाच्या अनुषंगाने उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनास सादर केलेला प्रस्तावानुसार मा . उच्च न्यायालयाने त्यांच्या आदेशात मंजूर केलेल्या प्रकरणी दि. १६.०८.२०१० व दि. २२.०२.२०१३ रोजीचे शासन निर्णय पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.



Scanned by CamScanner

शासन निर्णय :

मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांची पात्रता व त्यांना अनुज्ञेय असलेले क्षेत्र ठरविणंबाबतच्या कार्यपध्दतीसंबंधी निर्गमित करण्यात आलेले दि. १६.०८.२०१० व दि. २२.०२.२०१३ रोजी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आहे :-

अ) ज्या प्रकल्पांना दि. १६.०८.२०१० किंवा २२.०२.२०१३ पुर्वी पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे व अशा प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम पुर्ण झाले असेल अथवा महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिले असेल तर, अशाप्रकरणी दि. १६.०८.२०१० व दि. २२.०२.२०१३ रोजीचे शासन निर्णय पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येऊ नयेत.

ब) मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रं. १६६३/२०११ मध्ये दि. १९.०३.२०१५ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने ज्या प्रकल्पांना दि. १६.०८.२०१० पुर्वी पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे व अशा प्रकरणांमध्ये विकासकाने अद्याप म्हाडास देय होणारे अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपुर्द केलेले नाही, अशा प्रकरणी दि. १६.०८.२०१० रोजीचे शासन निर्णय पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यावेत.

क) दि. १६.०८.२०१० व दि. २२.०२.२०१३ पुर्वी पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेल्या प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम अपुर्ण असेल, अशा प्रकल्पातील अपात्र ठरविण्यात आलेले रहिवाशी/ भाडेकरू यांचेकडे दि. १३.०६.१९९६ पुर्वी त्या गाळ्यात वास्तव्य असणारी कागदोपत्री पुरावे असल्यास अशाप्रकरणी संबंधित भाडेकरू/ रहिवाशी यांना पुनर्वसनासाठी पात्र ठरविण्याबाबत प्रकरणनिहाय व गुणवत्तेवर शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( श्रीनिवास मोकलीकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव (पत्राने),
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा.मंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण, मंत्रालय, मुंबई-३२.
६. प्रधान सचिव (नगर विकास-१), मंत्रालय, मुंबई-३२.
७. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई-१.



Scanned by CamScanner

८. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१०. मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
११. मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
१२. सचिव, म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१३. निवड नस्ती, दुवपु-१ कार्यासन, गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

Scanned by CamScanner